Vol 5 Issue 10 April 2016 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF) Volume - 5 | Issue - 10 | April - 2016

Golden Research Thoughts

GRT

# अस्तित्ववाद आणि इ.स. 1980 नंतरची मराठीतील महानगरीय कादंबरी

प्रा. प्रवीण ताटे देशमुख
मराठी विभाग, मु. सा. काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर, ता. बारामती.

## प्रास्ताविक

एकोणिसाव्या शतकात अस्तित्ववादी तत्त्वज्ञानाचा उगम युरोपमध्ये झाला. सोरेन किर्केगार्ड या डॅनिश तत्त्ववेत्याने प्रथम अस्तित्ववादाच्या अंगाने आपल्या लेखनात विचार मांडले. नंतरच्या काळात फ्रेडरिक नीत्शे, कार्ल यास्पर्स, गेब्रिएल मार्सेल, मार्टीन हायडेगर, अल्बेर काम्यु व ज्यॉं पॉल सार्त्र या तत्त्वज्ञांनी अस्तित्वादाची मांडणी केली आहे. यापैकी सोरेन किर्केगार्ड हा डॅनिश होता. नीत्शे, यास्पर्स व हायडेगर जर्मन होते. तर मार्सेल–काम्यु व सार्त्र फ्रेंच होते. किर्केगार्ड, नीत्शे, मार्सेल व काम्यु यांचे लहानपणीच आई–वडीलांचे छत्र हरपले होते. यास्पर्स, मार्सेल, काम्यु व सार्त्र यांच्या व्यक्तिमत्त्वावर दोन्ही महायुद्धाचा जबरदस्त परिणाम झाला होता. यास्पर्स व हायडेगर वगळता बाकीचे सर्व जण ललित लेखक होते. काम्यु व सार्त्रला तर साहित्यनिर्मितीचे नोबेल परितोषिक मिळाले होते. या तत्त्ववेत्त्यांमुळेच अस्तित्ववादी तत्त्वज्ञान उदयास आले, वाढीस लागले व विकसित झाले.

प्रत्येक माणसाकडे विचार करण्याची शक्ती असते. तिलाच बुद्धी असे म्हणतात. बुद्धी हे मनुष्याला मिळालेले श्रेष्ठ वरदान आहे. बुद्धी हे मानवी अस्तित्त्वाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. बुद्धीच्या सहाय्यानेच मनुष्याला विश्वातील ज्ञात–अज्ञात गोष्टींचे ज्ञान होते असे मानणारी बुद्धीवादी परंपरा प्लेटो–ॲरिस्टॉटल यांच्यापासून देकार्त, हेगेल यांच्यापर्यंत प्रस्थापित होत गेलेली दिसते. देकार्त, हेगेल यांनी बुद्धीवादाचे शेवटचे टोक गाठले. देकार्तला तर आधुनिक तत्त्वज्ञानाचे जनक म्हणून संबोधले जाते. रेने देकार्त यांनी मांडलेली बुद्धीवादी परंपरा सोरेन किर्केगार्ड यांनी नाकारली. बुद्धीवादी परंपरेला कडाडून विरोध केला. या कडव्या विरोधातूनच अस्तित्ववादी तत्वज्ञानाचा जन्म झाला.



अस्तित्ववादी तत्वज्ञानाची पार्श्वभूमी समजून घेण्यासाठी दोन्ही महायुद्धांचा विचार करावा लागतो. पहिल्या महायुद्धाने जगाला प्रचंड हादरा दिला. फार मोठ्या प्रमाणावर जीवितहानी व वित्तहानी झाली. माणसेच माणसांच्या जिवावर उठली. किड्यामुंग्यासारखी माणसे मरु लागली. विसाव्या शतकाच्या आरंभापर्यंत वैज्ञानिक प्रगतीने दिपून गेलेले पाश्चिमात्य जग भयभीत, अस्थिर व असुरक्षित झाले. माणूस वैज्ञानिक शोधाचा वापर भीषण विनाशासाठी करु शकतो या भयंकर सत्याची जाणीव माणसाला प्रथमच झाली. पहिल्या महायुद्धाने माणसाचा माणसावरचा विश्वास उडाला. वैज्ञानिक तंत्रज्ञानाचा (शोधाचा) आनंद वाटण्याऐवजी वैज्ञानिक प्रगतीची भीतीच माणसाच्या मनात खोलवर रुतून बसली. जगावर आधिपत्य प्राप्त करण्याच्या साम्राज्यशाही ईर्ष्येतून दुसरे महायुद्ध झाले. इंग्लंड, फ्रान्स, रशिया व अमेरिका या मित्र राष्ट्रांनी हिटलरच्या जर्मनीचा व मुसोलिनीच्या इटलीचा पुन्हा एकदा पराभव केला. बर्लिनची भिंत उभी राहिली. या भिंतीमुळे जर्मनीचे दोन तुकडे पडले. पूर्व जर्मनी साम्यवादी, तर पश्चिम जर्मनी भांडवलशाहीवादी. पराभूत राष्ट्रांची अर्थव्यवस्था मोडकळीस आली. नोकऱ्या गेल्या. बेकारांची संख्या वाढू लागली. मत्सराची, सूडाची भावना वाढीस लागली. दुसऱ्या महायुद्धाने माणसाला संशयीत बनविले. माणुसकी नष्ट झाली. जुनी मूल्ये लोप पावली. भरवसा ठेवायचा तरी कोणावर? हेच सामान्य माणसाला उमगत नव्हते. त्यामुळे जग चिंतेने ग्रासले होते. माणसाच्या श्रद्धाच नीत्शे या जर्मन तत्त्ववेत्याने विस्कटून टाकल्या. नीत्शेनेच 'ईश्वराचा मृत्यू झाला आहे' ही सुप्रसिद्ध दवंडी 'वेड्या' च्या तोंडून वदवली. भरवसा कोणावर ठेवावा. याविषयी माणसाच्या मनात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. चिंतेचे, भयाचे, असुरक्षिततेचे साम्राज्य सामान्य माणसाच्या मनावर पसरले. आर्थिक, कौटुंबिक, सामाजिक व व्यावसायिक अशा कोणत्याच आघाडीवर त्याला किमान स्थैर्य लाभेनासे झाले. ''साऱ्या जगण्यातच एक प्रकारचा विस्कळीतपणा आला. यातून क्षण अन् क्षण उत्कटतेने जगण्याची किंवा जीवनालाच पाठ फिरवण्याची वृत्ती उत्पन्न

झाली. बाह्य परिस्थितीचा रेटा कितीही जबरदस्त असला तरी स्वतःकडे वळून बघणे, आपल्याला काय हवे आहे? कशासाठी आपण आटापिटा करीत आहे आणि मुख्य म्हणजे आपली स्वाभाविक उर्मी कोणती आहे हा शोध घेणे गरजेचे वाटू लागले.''1 हे रेखा साने–इनामदार यांचे आकलन महत्त्वपूर्ण आहे. जगण्याचे प्रयोजन कोणते? आत्मशोध घेण्याची प्रेरणा कोणती? युगधर्म जाणण्याचा मार्ग कोणता? या प्रश्नांचा शोध किर्केगार्डपासून सार्त्रपर्यंत अनेकांनी आपापल्या मगदुराप्रमाणे घेण्याचा प्रयत्न केला. यातून अस्तित्त्ववादी तत्त्वज्ञान निर्माण झाले.

देकार्त व हेगेल यांनी शिखरावर पोहोचवलेल्या बुद्धीवादी परंपरेचा सोरेन किर्केगार्ड यांनी कडवा निषेध केला. किर्केगार्डच्या प्रखर विरोधातून अस्तित्त्ववाद आकारास आला. किर्केगार्ड, नीत्शे, मार्सेल, हायडेगर, काम्यु व सार्त्र या तत्त्ववेत्यांमध्ये अनेक बाबतींत भिन्नता होती. वंश, कालखंड, व्यवसाय, धर्म, शिक्षण व स्वभाव याबाबतीत व विचारांमध्ये ही मतभिन्नता होती. तरी मानवी अस्तित्त्वास सर्वोच्च स्थान, आत्मनिष्ठा, निवडीचे स्वातंत्र्य, परात्मता, जगण्यात आणि विचारात एकवाक्यता अशा काही बाबींमध्ये एकवाक्यता असल्यामुळे त्यांच्या लेखनातून अस्तित्त्ववादी तत्त्वज्ञान उदयास आले. अस्तित्ववादी तत्त्वज्ञानाच्या निर्मितीसंदर्भात डॉ. महेश खरात म्हणता, ''दुसऱ्या महायुद्धोत्तर कालखंडात संपूर्ण युरोप अक्षरशः ढवळून निघाला. मानवी जीवनमूल्यांची राखरांगोळी झाली. वैज्ञानिक प्रगतीची भीती मनामनात घर करून बसली. मृत्यूच्या भयाने व्याकूळ झालेल्या माणसांना अस्तित्त्वाची चिंता वाटू लागली. यातूनच अस्तित्त्ववादी तत्त्वज्ञान निर्माण झाले''2 या अस्तित्त्ववादाच्या निर्मितीची कारणे विचारात घेण्याबरोबरच अस्तित्त्ववादाची आणखी काही आशयसूत्रेही नजरेसमोर ठेवावी लागतात. किर्केगार्डपासून सार्त्रपर्यंतच्या ज्या सात तत्त्वज्ञानी अस्तित्त्ववादाची मांडणी केली. त्यांच्या लेखनातून आठ आशयसूत्रे आविष्कृत झालेली आहेत.

1.आस्तिकता / नास्तिकता (Thesism – Atheism) 2. निवडीचे स्वातंत्र्य (Freedom of Choice)
3. आत्मनिष्ठा व सत्य (Subjectivity & Truth) 4. परात्मता / दुरावा (Alienation)
5. व्यस्तता / असंगतता (Absurdity) 6. चिंता, भय व मृत्यू (Anxiety, Dread & Death)
7. नसतेपणा (Nothingness) 8. अस्सल जीवनसरणी (Authentic Existence) ही ती आशयसूत्रे होत. या आशयसूत्रांना ध्यानात घेऊन इ.स.1980 नंतरच्या महानरीय कादंबरीचा अस्तित्त्ववादाच्या अंगाने याठिकारणी प्रातिनिधीक स्वरूपात विचार करणार आहोत.

'निवडस्वातंत्र्य' हे अस्तित्त्ववादाचे महत्त्वाचे आशयसूत्र आहे. त्याचा प्रत्यय महानगरीय कादंबरीतून येतो. अरूण साधू यांच्या 'शोधयात्रा' कादंबरीतील नायक श्रीधर हा अत्यंत बुद्धीमान तरुण आहे. एका खाजगी कंपनीत तो 'बिझनेस एक्झिक्युटिव्ह' अशा मोठ्या पदावर नोकरी करीत असतो. एखादी गोष्ट ठरवली की, तिच्यात मनःपूर्वक स्वतःला झोकून देण्याच्या प्रवृत्तीमुळे तो कंपनीत सर्वोच्च पदी पोहोचलेला असतो. लौकिक जीवनात अत्यंत यशस्वी ठरलेला हा तरुण आपल्या यशस्वी जीवनाकडे पाठ फिरवून स्वतःच्या जीवनशोधासाठी म्हणून बाहेर पडतो. आणि भटकंती करतो. श्रीधरचा हा शोधप्रवास म्हणजे एकूणच मानवी श्रद्धेचा आणि त्याचबरोबर परमेश्वराचाही कुतूहलयुक्तपणे घेतलेला शोध आहे. मानवी जीवनाचा नेमका अर्थ काय? श्रद्धा म्हणजे काय? परमेश्वर आहे की नाही? असेल तर त्याचे स्वरूप कसे आहे? नसेल तर श्रद्धेला काही अर्थ आहे का? माणसाच्या अस्तित्त्वालाच ढवळून काढणाऱ्या अशा मूलभूत प्रश्नांभोवती श्रीधरची शोधयात्रा सुरू होते. हा शोधयात्रेचा त्याचा निर्णय 'निवडस्वातंत्र्याचा' भाग आहे.

श्रीधरचे अंतःकरण भावनाशील आहे. स्वतःच्या श्रद्धांवर त्याची निष्ठा आहे. या निष्ठा सभोवतीच्या वास्तव्यात डळमळीत होतात. तेव्हा त्याच्या मनाला असह्य वेदना होतात. या श्रद्धांचे मूळ शोधताना अनेकदा त्याच्या पदरी निराशा येते. श्रद्धेमागे धावणाऱ्या मानवी जीवनातील रितेपणा–अपूर्णता, असंतुष्टता, निरर्थकता त्याला पदोपदी जाणवते, ''या साऱ्याला काही खरोखर अर्थ आहे का?'' ('शोधयात्रा',पृ. 10) हा प्रश्न त्याला एकसारखा भेडसावतो. तो म्हणतो, ''माझा परमेश्वर नास्तिक आहे. अश्रद्ध आहे. मला ही बेचैनी धुवून काढायची आहे. या असमाधानामुळे अंगात जी आग निर्माण झाली आहे. ती विझवून थंड करायची आहे. श्रद्धेविना माणूस हा पाण्याविना तडफडणारा मासा. तशीच माझी अवस्था आहे. वाटल्यास असंही म्हणा, की मी श्रद्धेच्या शोधात आहे.'' ('शोधयात्रा',पृ.64) श्रीधरचे हे मूलगामी चिंतन आस्तिक–नास्तिकच्या अनुषंगाने चर्चा करते आहे. तेव्हा श्रद्धेच्या शोधासाठी बाहेर पडलेला श्रीधर 'निवडस्वातंत्र्य' उपभोगतो.

विलास सारंग यांच्या 'एन्कीच्या राज्यात' या कादंबरीतील नायक प्रमोद वेंगुर्लेकर हाही 'निवडस्वातंत्र्या'चा पुरस्कर्ता आहे. प्रमोद भारतातील उच्च पदवी संपादन करून अमेरिकेत येतो, ब्लूमिंग्टनला राहून शिक्षणक्षेत्रातील सर्वोच्च असलेली डॉक्टरेटची पदवी मिळवितो. अमेरिकेत जॉब मार्केट डाऊन असतानाही प्रमोदला नोकरी मिळते. परंतु मिळालेली नोकरी न स्वीकारता प्रमोद मध्यपूर्वेतील इराकला जाण्याचा निर्णय घेतो. निवडस्वातंत्र्य हे आशयसूत्र प्रमोदच्या बाबतीत खरे ठरते. तेव्हा महानगरातील अस्वस्थतेला ठोकरून मनाप्रमाणे जगण्यासाठी नायक आपले स्वातंत्र्य अबाधित ठेवत निवडीचे स्वातंत्र्य घेतात हे अस्तित्त्ववादी तत्त्वज्ञान आहे.

भय, चिंता आणि मृत्यू हे अस्तित्त्ववादी तत्त्वज्ञानातील एक महत्त्वाचे सूत्रही या महानगरीय कादंबरीत प्रभावीपणे आले आहे. विलास सारंग यांच्याच 'एन्कीच्या राज्यात' या कादंबरीचा येथे विचार करता येईल. कादंबरीचा नायक प्रमोद सिक्युरिटी डिपार्टमेंटमध्ये रजिस्टर न करताच टाईपरायटर घेऊन येतो. प्रमोदकडून अजाणतेपणाने घडलेला हा अपराध आहे. या अपराधामुळे प्रमोदच्या मनात वेगळीच भीती घर करून राहते. प्रमोदचे मन थाऱ्यावर राहत नाही. टाईपरायटर झाकून ठेवला जातो तरी गुन्हा घडल्याची टोचणी सतत मनाला लागून राहते. सतत भयाचे सावट प्रमोदच्या मनामध्ये घिरट्या घालत राहते. प्रमोद शरवान नावाच्या कुर्दी विद्यार्थ्याला नाटकात ज्युलियस सीझरची भूमिका देतो. शरवान अस्खलित बोलत असतो. भूमिका जिवंत करण्याचे नाट्यगुण त्याच्याजवळ आहेत. परंतु एके दिवशी शरवान अचानक प्रमोदकडे येतो. राजकारणात रस नसल्यामुळे कम्युनिस्ट पार्टीमध्ये काम करण्याचे शरवान नाकारतो. कम्युनिस्ट पक्षाच्या सबरीला शरवानाचा नकार आवडलेला नसावा. म्हणून सबरी व इतर सदस्य आपल्याविरूद्ध गुप्त कट करीत आहेत असे शरवानला वाटत राहते. नाटकात कॅस्काचे काम करणारा जमाल कट्टर पार्टीवाला असतो. संशयाचे भूत शरवानच्या मानगुटीवर असे बसते की, सीझरची उत्तम भूमिका करणारा शरवान पुढेपुढे घुमा होतो. भय शरवानच्या मनात घुसते. खुनाच्या दृश्याचा अभिनय करताना त्याचे शरीर थरथर कापायला लागते. ''छाती लकलकते न् धडधडायची एकदम थांबते की काय असं वाटतं. ते अंगात घुसणारे सुरे...! मला हा रोल त्यांनी दिला. यात नक्की काहीतरी आहे...! माझ्याविषयी त्यांचं मन कलुषित झालं आहे... जमाल सुरा खुपसण्याचं ॲक्टिंग करताना माझ्याकडे अशा काही नजरेने पाहतो.'' ('एन्कीच्या

राज्यात',पृ.99–100) जमालच्या नजरेतील धार शरवानला भीतिदायक वाटते. प्रमोद शरवानला धीर देण्याचा प्रयत्न करतो. पण त्याचा काही उपयोग होत नाही. नाटकाचे सादरीकरण जवळ आल्यावर शरवान गायब होतो. शरवान व प्रमोदवर आलेले भीतीचे सावट व मनात सारखीसारखी निर्माण होणारी चिंता या अस्तित्त्ववादातील चिंता व भय या सूत्राचीच द्योतक आहे.

असंगतता किंवा विसंगती हे एक अस्तित्त्वादाचे सूत्र आहे. अरूण साधू यांच्या 'शोधयात्रा' कादंबरीचा श्रीधर आपल्या यशस्वी जीवनाकडे पाठ फिरवून स्वतःचा जीवनशोध घ्यायला म्हणून बाहेर पडतो. प्रवासाला निघण्यापूर्वी मरीन ड्राईव्हर तो विनाकारण पावसात भिजत उभा राहतो. त्याच्या या कृतीमागे तसे कोणतेही सबळ कारण नसते. तत्पूर्वी समुद्रात उडी मारून आत्महत्या करण्याचा एक अकल्पित विचारही त्याच्या मनात उगीचच येऊन जातो. पण तो पुरेसा बळकट नसतो. नंतर टॅक्सीतून उद्देशहीन फेरफटका मारतो, चर्चगेटवर लोकलमध्ये शिरकाव करतो. त्यानंतर वसईकडच्या जंगलातील भ्रमंती– अशी त्याची आत्मिक शोधाची भ्रमंतीतील कृती, विसंगत व असंग वाटते. त्याच्या भटकंतीला निश्चित अशी दिशा नाही. अर्धवट ग्लानी आणि अर्धवट चेतना अशा मानसिक अवस्थेत तो दिसते त्या वाटेने व मिळेल त्या साधनाने प्रवास करतो. ही सगळी कृती विसंगत वाटते. आपल्या जगण्याबद्दलची निरर्थकता त्याला अस्तित्त्ववादाच्या तत्त्वज्ञानाकडेच घेऊन जाते आहे हेच येथे स्पष्ट होते.

मानवी जीवनातील एकाकीपण/एकटेपण हे अस्तित्त्ववादाचेच अंग आहे. रघू दडवते यांच्या 'वसेचिना' कादंबरीतील विसू नोकरीच्या निमित्ताने मुंबईत येतो. बरीच भटकंती केल्यानंतर मोठ्या प्रयासाने त्याला चिंचपोकळी स्टेशनजवळच्या एका म्युन्सिपाल्टीच्या शाळेत क्लार्कची नोकरी लागते. शंभर रूपये पगाराची ही नोकरी पक्की नसते. दुसरी चांगली नोकरी मिळेपर्यंतची ही सोय असते. नंतर त्याला लॅगिंग्टन रोडवरच्या फार्मास्यूटिकल कंपनीत दीडशे रूपये पगाराची नोकरी लागल्यावर त्याला खरीखुरी नोकरी मिळाल्याचा आनंद वाटतो. अग्निहोत्रीची पुण्यात बदली झाल्यावर त्याला एकटे–एकटे वाटते. त्याला घर, नोकरी व आजूबाजूची मुंबई त्याला खायला उठल्यासारखी वाटते. तो सामाजिक चळवळीत काम करतो. झोपडपट्टी संघात काम करतो, पण कुठेच रमत नाही. असा हा विसू मुंबईच्या चाकरमानी विश्वात भटकत राहतो. अस्थिर जीवन जगतो. कोणत्याही एका जागेवर जास्त दिवस टिकत नाही. झोपडपट्टी संघातही जास्त दिवस रमत नाही. असा हा विसू मुंबईत एकटा जीव सदाशिव अशा अवस्थेत भटकत असायचा. स्वतःला अस्सल खानदानी, ब्राह्मण म्हणून घेणारा विसू आता दारूच्या गुत्त्यांवर दिसायचा. एकटेपणावर त्याने शोधलेला हा उपाय होता. समाजवादी मित्राबरोबर 'एकच प्याला' घेतलेला विसू आता ऑफिस सुटल्यावर एकटाच पीत बसायचा. त्यावेळेला त्याला निवांत वाटायचे. त्याच्या बरोबरीची सर्व माणसे आता निवृत्त होत होती. कुणाच्या मुलाची नोकरी पक्की होत होती. मुलींची लग्ने होत होती. विसू मात्र असाच होता सडाफटिंग! त्याला पुढे–मागे कुणीच नव्हते. विसूच्या आयुष्याची फरफट मात्र सुरूच असते. तो कुठेच रमला नाही. मुंबईत नाही, नोकरीत नाही, नोकरीत नाही तसा संसारातही नाही, विसू... विसावलाच नाही. शेवटपर्यंत असाच... वसेचिना! ही विसूच अवस्था. महानगरातील चाकरमान्यांच्या अस्तित्त्वाचीच लढाई आहे. महानगरात कसा माणूस एकाकी होतो. अस्वस्थ होतो. आयुष्यभर रिता राहतो याची जाणीव ही कादंबरी करून देते. ही जाणीवच अस्तित्त्ववादाचे तत्त्वज्ञान आहे.

'परात्मता' हे अस्तित्त्ववादाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. हेगेल व मार्क्सने परात्मतेची दखल घेतली आहे. माणसापासून माणूस तुटणे, ईश्वरापासून अलग होणे, समाजावर प्रभाव पाडण्यासाठी धडपडत असतानाच दूर्बल असल्याची जाणीव होणे, लय व मेळ विस्कटणे, परका, अनोळखी बनल्याची भावना निर्माण होणे. स्वतःपासून दुरावले जाणे, स्वत्त्व हरवून बसणे, आत्मा हरवून बसणे, माणूस असण्याच्या शक्यता नष्ट करणे ही परात्मतेची व्यवच्छेदक लक्षणे म्हणून नोंदविता येतात. या लक्षणांमधून माणसाला वाटते की, आपले जगणे निरर्थक आहे. अर्थशून्य आहे. त्यातून तो अस्वस्थ होतो. ही अस्तित्त्ववादी विचारांची परिणती अनिल दामले यांच्या 'गौतमची गोष्ट' कादंबरीत येते. या कादंबरीचा नायक गौतमला आत्मनिरीक्षणातून काही सत्याचे कण सापडतात. तेव्ह प्रश्न निर्माण होतात – ''शेवटी उशिरा मी तात्त्विक झालो. इतक्या वर्षाच्या आयुष्यात पैसे आणि पैशांनी मिळणारी सुखं सोडून काय मिळवले मी?... प्रश्न होता तो जगून काय करायचं, कशाकरता जगायचं...! इतकी वर्ष आपल्याला हवं ते मिळवायचं, गुडगिरी सोडून बाकीचे जे त्या परिस्थितीत योग्य वाटतील ते उपाय वापरायचे एवढंच मला माहीत होतं. न्याय–अन्याय हा आपल्या उद्देशावर अवलंबून नसतो, तर कायदा मोडला हे सिद्ध न करता येईल अशा पद्धतीने मोडण्यातल्या यशाच्या प्रमाणावर किंवा कायद्यातून योग्य तो अर्थ काढून आपल्या कृतीचं समर्थन करण्याच्या यशावर अवलंबून असतो. हेच मला माहीत होतं. धर्मातल्या नीतिमत्तेचा प्रत्यक्ष जीवनात उपयोग होत नाही, कारण ती नीतिमत्ता वेगळ्या उद्देशासाठी असते. आणि माझ्या जीवनाचे उद्देशच वेगळे होते. माझ्या या धारणेने इतकी वर्षे मी जगलो, पण आज अखेर या जगण्याची बेरीज शून्य होती.'' ('गौतमची गोष्ट',पृ. 80) पुढे गौतम म्हणतो, ''जशी दारू पोटात गेली तसा मी स्वतःबद्दल आयुष्यात पहिल्यांदाच विचार करायला लागलो. मी निरूपयोगी ठरलो ते आज नव्हे. तर एकूणच सगळं जगणं माझ्या स्वतःच्या दृष्टीनं निरूपयोगीच होतं ह्याची मला जाणीव हळूहळू जास्त स्पष्ट व्हायला लागली.'' ('गौतमची गोष्ट',पृ.81) पुढे गौतम स्वतःच म्हणतो, ''आपण कसे जगलो याचं हे प्रमाणिक, सखोल, अभ्यासपूर्ण चिंतन थोड्या वेळानं मागं पडलं आणि आता कशासाठी जगायचं हा आधीचाच प्रश्न पुन्हा पुढे आला.'' ('गौतमची गोष्ट',पृ.81) दारू आणि सिगारेटच्या धुरात हे आत्ममुग्ध, आत्मकेंद्रित चिंतन चाललेले असल्यामुळे त्याला असेही वाटते, ''हा ग्लास अगदी तन्मयतेने रिचवत असताना माझ्या प्रश्नांची मला मिळालेली उत्तरे कठोर असली तरी एखाद्या शास्त्रीय सिद्धांतासारखी बिनचूक आहेत याची मला खात्री पटली. माझं आजपर्यंतचं जीवन नीरूपयोगी आहे. माझ्या जगण्याला अर्थ नव्हता आणि यापुढेही असणार नाही.'' ('गौतमची गोष्ट',पृ.81) पुढे गौतम झोपेच्या गोळ्या घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा गौतमचा एकटेपणा, त्याची जीवनविषयक असणारी निरर्थक जाणीव, त्याचा आत्महत्येचा प्रयत्न ह्या गोष्टी अस्तित्त्ववादी विचारसरणीच्याच आहेत. तेव्हा 'गौतमची गोष्ट' ही अस्तित्त्ववादी कादंबरी ठरते.

अशा प्रकारे अस्तित्त्ववादी तत्त्वज्ञानाची अनेक आशयसूत्रे आपणास महानगरीय कादंबरीतून दाखविता येतील. किंबहुना, मानवी जीवनातील निरर्थकता, एकटेपण, आत्मकेंद्रितता, भय, चिंता, मृत्यू, परात्मता, आपल्या मर्जीप्रमाणे अस्सल जीवन जगणे, त्यासाठीचे निवडस्वातंत्र्य, महानगरीय जीवनातील असुरक्षितता व अस्थिरता, अस्वस्थतेचा आग्रह, प्रचंड व्यस्तता, व्यग्रता, विसंगती ही आशयसूत्रेच महानगरीय कादंबरीत प्रभावीपणे व्यक्त झाली आहेत. ही सर्व आशयसूत्रे अस्तित्त्ववादी तत्त्वज्ञानाशी निगडित आहेत. तेव्हा इ. स. 1980 नंतरची मराठीतील महानगरीय कादंबरी ही अस्तित्त्ववादी विचारसरणीतून अभिव्यक्त होते, असे ठामपणे म्हणता येते.

### संदर्भ

1) इनामदार–साने रेखा, 'अस्तित्त्ववाद आणि मराठी कादंबरी', राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, सप्टेंबर 2004. पृ. 05

2) खरात महेश डॉ., 'अस्तित्त्ववाद व्हाया कोसला, एन्कीच्या राज्यात', 'अक्षरगाथा', कादंबरी विशेषांक. संपा. जाधव मा. मा., एप्रिल ते जुलै 2011. जोड–अंक. नांदेड, पृ. 101

### आधारभूत ग्रंथ

1)'शोधयात्रा', अरूण साधू, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, 1989

2)'एन्कीच्या राज्यात', विलास सारंग, मौज प्रकाशन, मुंबई, 1983

3)'गौतमची गोष्ट', अनिल दामले. पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,

4)'वसेचिना', रघु दंडवते, प्रास प्रकाशन, मुंबई. 1983

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing



Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org